:: उमेदवारांसाठी सुचना::

उस्मानाबाद जिल्हा पोलीस भरती-२०१८ लेखी परिक्षा

उस्मानाबाद जिल्हा पोलीस दलातील पोलीस शिपाई यांच्या (६२) रिक्त पदाच्या भरतीसाठी दिनांक १२/०३/२०१८ ते २७/०३/२०१८ पावेतो उमेदवारांची मैदानी चाचणी घेण्यात आली आहे. सदर मैदानी चाचणीमध्ये ५० व त्यापेक्षा जास्त गुण घेवुन सेवाप्रवेश नियम-२०११ व त्यामध्ये वेळो-वेळी केलेल्या सुधारणाप्रमाणे रिक्त पदांनुसार उमेदवाराने भरलेल्या ऑनलाईन अर्जाप्रमाणे सामाजिक व समांतर आरक्षणाप्रमाणे १:१५ च्या प्रमाणात लेखी परिक्षेसाठी (१००३) एवढे उमेदवार पात्र झालेले आहेत. लेखी चाचणीस पात्र झालेल्या उमेदवारांची माहिती पोलीस अधीक्षक कार्यालय उस्मानाबाद येथील नोटीस बोर्डावर डकविण्यात आलेली आहे. तसेच https//mahahpolice.mahaonline.gov.in व www.osmanabadpolice.com वर माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. उमेदवारांची लेखी परिक्षा दिनांक ०२/०४/२०१८ रोजी रामकृष्ण परमहंस महाविद्यालय,उस्मानाबाद येथे घेण्यात येणार आहे. तरी उमेदवारांनी दिनांक ०२/०४/२०१८ रोजी दुपारी १.०० वा. बायोमेट्रीक तपासणी कामी हजर रहावे. उमेदवारांनी लेखी चाचणी करिता येतांना प्रवेशपत्र, चेस्ट क्रमांक सोबत आणणे आवश्यक आहे. उमेदवारांनी लेखी चाचणीस येताना मोबाईल,कॅल्क्युलेटर, ब्लु-टेब इ. इलेक्ट्रॉनिक साहित्य सोबत घेवुन येवु नये.

उमेदवारांची लेखी चाचणी मराठी भाषेत घेण्यात येणार असुन ती १०० गुणांची राहिल त्याकरिता कालावधी ९० ( नव्वद ) मिनिटांचा असेल. सर्व प्रश्न बहुपर्यायी स्वरुपाचे राहतील.

लेखी चाचणी करिता खालील विषय राहतील.

१) अंकगणित २) सामान्य ज्ञान व चालु घडामोडी ३) बुध्दीमत्ता चाचणी ४) मराठी व्याकरण व विषयांचा समावेश असेल. सर्व प्रश्न बहुपर्यायी स्वरुपाचे राहतील.उत्तरपत्रिका ही दुय्यम प्रतीत राहणार असुन उमेदवारास दुय्यम प्रत (कार्बन प्रत ) सोबत घेऊन जाता येईल. उत्तरपत्रिका ओएमआर पध्दतीने संगणकाद्वारे तपासण्यात येईल. तसेच काही उत्तरपत्रिकांचे नमुना चेक करण्यात येईल. जर कोणत्याही उमेदवाराने उत्तरपत्रिकेतील गुणाबद्दल तक्रार असल्यास उत्तरपत्रिकेची फेर तपासणी करण्याची ४८ तासाचे आत मागणी केल्यास ती स्विकारण्यात येईल. उत्तर पत्रीका फेर तपासणी कामी पोलीस उप अधीक्षक (मु) यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. त्यांचेकडुन उत्तरपत्रिकेची फेरतपासणी करण्यात येईल. त्याकरिता उमेदवारास रु २००/- इतकी फी आकरण्यात येईल. उत्तर पत्रीका फेर तपासणी कामी पोलीस उपअधीक्षक (मु) यांचा निर्णय अंतिम राहिल.

लेखी परिक्षा झाल्यानंतर त्वरीत नमुना उत्तरपत्रिका ( Model Answersheet ) सुचना फलकावर लावण्यात येईल. तसेच शारिरीक चाचणी व लेखी चाचणीमध्ये प्राप्त झालेल्या एकत्रित गुणांच्या आधारे कागदपत्र पडताळणीतील पात्रतेच्या अधिन राहुन तात्पुरती गुणवता यादी शक्यतो २४ तासामध्ये पोलीस मुख्यालय उस्मानाबाद येथे बाहेरील फलकावर लावण्यात येईल. तसेच https//mahahpolice.mahaonline.gov.in व www.osmanabadpolice.com या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

Scanned by CamScanner